**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**RESERVE BANK OF INDIA**
**RBI On Internet:** http://www.rbi.org.in
**Email:** helpprd@rbi.org.in

मार्च १८,२००४

**निवासी व्यक्तींसाठी २५००० अमेरिकन डॉलरची उदारीकृत भरणा योजना-गुंतवणुकदार संरक्षण – प्रकटीकरणासंबंधी आवश्यकता**

ए.पी.डी.आय.आर (सिरीज) सूचनापत्र क्र. ६४ दिनांक फेब्रुवारी ४, २००४ नुसार रिझर्व्ह बँकेने निवासी व्यक्तींना प्रत्येक कॅलेंडर वर्षामध्ये जास्तीत जास्त २५००० अमेरिकन डॉलर पर्यंत रकमेचा भरणा करण्यास परवानगी देण्याची योजना कार्यान्वित केली आहे. ही सुविधा आता कोणत्याही चालू अगर भांडवल खात्या मधील, अगर या दोन्हींच्या संमिश्र, व्यवहारासाठी प्रत्येक वर्षी जस्तीत जास्त २५००० अमेरिकन डॉलरचा भरणा करण्यासाठी उपलब्ध आहे.

त्यानंतर भारतात कारभार असलेला काही परदेशी बँका, तसेच भारतीय बँका वरील योजने अंतर्गत, निवासी व्यक्तींकडून ठेवींची अपेक्षा करीत आहेत असे निर्दनास आले आहे की अनेक जाहिराती प्रसिद्ध झाल्या असून ही त्यांमध्ये परदेशांमधील केंद्रामध्ये विशिष्ट व्याज दरांनी परकीय चलना मध्ये ठेवी/निधी ठेवण्याची विनंती केली गेली होती. या जाहीरातींमध्ये संभाव्य ठेवीदारांच्या मार्गदर्शना साठी योग्य ती प्रकटीकरणे अंतर्भूत नाहीत. ज्यांची भारतामध्ये कार्यसंबंधी उपस्थिती नाही अशा परदेशी व्यक्ती/संस्था, यांच्याकडून परदेशी चलनातीत ठेवी मागवण्याच्या योजनांचे भारतामध्ये विपणन केल्याने अधीक्षकीय चिंताही उत्पन्न होतात.

त्यामुळे, जनहितार्थ असे ठरविण्यात येत आहे की परवाना प्राप्त बँकिंग कंपनी वगळता, इतर कोणाही व्यक्ती/संस्थांना निवासी व्यक्तींकडून परकीय चलनात ठेवी मागविता येणार नाहीत. तसेच, भारतीय बँका तसेच भारतामध्ये कार्यसंबंधी उपस्थिती नसलेल्या, अशा सर्व बँकांनी त्यांच्या परदेशी/परदेशस्थ शाखांसाठी परदेशी चलनात ठेवी मागविण्याच्या त्यांच्या योजनांचे निवासी व्यक्तींसाठी विपणन करण्यासाठी, किंवा परदेशस्थ म्युच्युअल फंड अगर इतर कोणत्याही परदेशी वित्तसेवा कंपनीचे प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी घ्यावी.

अशी पूर्वपरवानगी मागत असताना, बँकाना खालील माहिती रिझर्व्ह बँकेला द्यावी लगेल :

- बँकेचे नाव व तिच्या मुख्य कार्यालयाचे स्थान (तसेच असल्यास स्थानिक कार्यालयांचे) व पूर्ण पत्ता.
- बँकेच्या मुख्य कार्यालयावर देखरेख करण्याची जबाबदारी असलेल्या प्रायमरी बँक सुपरवायझरी ऑथॉरिटी (किंवा ऑथॉरिटीज) चे नाव

- मूडीज अगर स्टँडर्ड अँड पुअर यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकाराहर्स असलेल्या एखाद्या गुणांकन संस्थेने दिलेले दीर्घ मुदती साठीचे गुणांकन.
- विपणन केल्या जात असलेल्या योजनेची संपूर्ण माहिती

या विषयीचे अर्ज चीफ जनरल मॅनेजर-इन-चार्ज, डिपार्टमेंट ऑफ बँकिंग ऑपरेशन्स अँड डेव्हलपमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सेंट्रल ऑफिस, सेंटर -१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४००००५ यांचे नावे केले जाऊ शकतील.

वरील सूचनांमुळे या योजने अंतर्गत परवानगी असलेल्या भांडवली खात्यामध्ये गुंतवणुक करण्याच्या निवासी व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येणार नाहीत.

**अजित प्रसाद**
व्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/१०९८**